CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २१ सप्टेंबर २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : ३५३ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८




## लोटेवाडी येथे शेळ्या, बोकडांची चोरी

सांगोला : शेतातील लोखंडी जाळी कुंपणाच्या तारा कट करून दहा शेळ्या व सहा बोकड असा सुमारे एक लाख रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना लोटेवाडी (ता. सांगोला) येथील सातारकर वस्ती येथे घडली. याबाबत सरपंच विजयकुमार उत्तमराव खांडेकर यांनी चोरट्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.

सरपंच विजयकुमार खांडेकर यांनी शेतीला पूरक व्यवसाय खिलार गाई, म्हशीसह एकूण लहान मोठ्या २६ शेळ्या पाळल्या आहेत. मंगळवारी सकाळी सहाच्या सुमारास नेहमीप्रमाणे ते शेतात गेले असता कुंपणामध्ये २६ शेळ्या पैकी १६ शेळ्या व बोकड कमी असल्याचे दिसून आले सदर शेतात आजूबाजूला शोध घेतला असता शेळ्या मिळून आल्या नाहीत.

# मोदी सरकार जिंकले, विरोधक अखेर नमले

## महिला विधेयक लोकसभेत मंजूर

## ४५४ खासदारांचा भक्कम पाठिंबा

सुराज्य/विशेष प्रतिनिधी



संसदेच्या नव्या सभागृहातील लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा अखेर विजय झाला.विरोधकांना शेवटी-शेवटी नमते घ्यावे लागले. त्यामुळे महिला आरक्षण विधेयक बुधवारी सायंकाळी मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने ४५४ तर विरोधात फक्त दोन सदस्यांनी मतदान केले. तब्बल दोन दिवस यावर चर्चा झडली. विरोधकांनी मोदी सरकारवर तोंडसुख घेतले. हे महिला विधेयक आरक्षण नसून मोदी यांचा इलेक्शनचा जुमला आहे, असा आरोप विरोधकांनी केला होता.भाजपने देखील तोडीस तोड असे उत्तर दिले. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हे विधेयक आणून मोदी सरकारने विरोधकांची दमछाक केली होती. विरोधाची भूमिका न घेता विरोधकांनी अखेर या विधेयकाला मान्यता दिली. महिला आरक्षण विधेयक हे घटनादुरुस्ती विधेयक आहे. हे विधेयक आता राज्यसभेत सादर करण्यात येणार आहे. राज्यसभेच्या मंजुरीनंतर महिला आरक्षण विधेयक राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. त्यानंतर घटनादुरुस्ती होईल.

महिला आरक्षण कायद्याची १९९६ पासून सुरू झालेली प्रतीक्षा आता संपली आहे. लोकसभेत सादर करण्यात आले नाही. महिला आरक्षण कायदा लागू झाला तरी त्यांची अंमलबजावणी होण्यास किमान ८ ते १० वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे म्हटले जात आहे. आगामी काळात होणारी जनगणना आणि त्यानंतर होणारे मतदारसंघाची पुनर्रचनेत महिला आरक्षण लागू होणार आहे.

१९९६ नंतर महिला आरक्षण विधेयक अनेकदा संसदेच्या पटलावर मांडण्यात आले आणि प्रत्येक वेळी त्याला विरोधाचा सामना करावा लागला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या दोन वर्षापूर्वी म्हणजेच २०१७ मध्ये काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी याबाबत पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले होते. महिला आरक्षण विधेयक २०१० मध्ये राज्यसभेत मंजूर होऊनही लोकसभेत मांडण्यात आलेले नाही. त्यामुळे हे विधेयक रखडले होते.

### मागणी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची...

स्वातंत्र्यपूर्व काळातही महिलांना राजकीय आरक्षण देण्याची मागणी केली गेली होती. बेगम शाह नवाज आणि सरोजिनी नायडू यांनी १९३१ मध्ये तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात नवीन राज्यघटनेतील स्त्रियांच्या परिस्थितीबाबत उल्लेख केलेला होता. त्यांच्या मते, महिलांना कोणत्याही पदावर बसवणे हा एक प्रकारचा अपमान ठरला असता त्यामुळे महिलांनी थेट नियुक्ती न देता त्यांना निवडणुकांना सामोरे जाऊ द्यावे, अशी त्यांची इच्छा होती.संविधान सभेच्या चर्चेतही महिला आरक्षणाचा मुद्दा आला होता, पण तो अनावश्यक असल्याचे सांगून या मुद्द्यावर चर्चा टाळली गेली.

● स्वातंत्र्यानंतर समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळेल अशी अपेक्षा करण्यात आलेली होती. त्यानंतरही महिलांना राजकीय आरक्षण दिले गेले नाही.त्यामुळे मागील पंच्याहत्तर वर्षांमध्ये महिला आरक्षणावर मोठमोठ्या चर्चाच होत गेल्या. १९७१ मध्ये स्थापन झालेल्या एका समितीने भारतातील महिलांच्या परिस्थितीवर आणि कमी होत चाललेल्या राजकीय प्रतिनिधित्वावर भाष्य केले.या समितीतील बहुसंख्य सदस्य विधिमंडळामध्ये महिलांना आरक्षण देण्याच्या विरोधात होते, मात्र यापैकी काही सदस्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याला मात्र पाठिंबा दिला. त्यानंतर हळूहळू अनेक राज्य सरकारांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण जाहीर करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्राने याबाबत देशात पहिल्यांदा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आधी ३३% आरक्षण देऊ केले आणि नंतर ही मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत वाढवली.

### सध्या स्थिती काय आहे?

१९५२ साली गठीत झालेल्या पहिल्या लोकसभेमध्ये फक्त २४ महिला खासदार होत्या. कालांतराने यामध्ये अनेक चढउतार आले मात्र लोकसभेतील महिलांची टक्केवारी कधीच १४ टक्क्यांच्या वर जाऊ शकली नाही. सध्याच्या १७व्या लोकसभेमध्ये महिलांची टक्केवारी १४ टक्के आहे. सध्या आपल्या देशात ७८ महिला खासदार आहेत मागील कार्यकाळात हीच संख्या ६२ होती. संसदेतील महिलांच्या टक्केवारीबाबत बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळ या देशांपेक्षाही भारताची टक्केवारी कमी आहे.

● महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड आणि केरळ यासारख्या अनेक राज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर तरतुदी केल्या. लोकसभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष मीरा कुमार या देखील काँग्रेसच्याच सदस्य होत्या. महिला आरक्षण विधेयक देखील काँग्रेसनेच आणले होते मात्र खासदारांचं संख्याबळ नसल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकलं नाही. माजी पंतप्रधान राजीव गांधी आणि महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आधी ३३ % आरक्षण देण्याचा निर्णय झाला. महाराष्ट्र हे असा निर्णय घेणारे पहिले राज्य ठरले.

**विधेयकातले ठळक मुद्दे :** ▶▶या आरक्षणामुळे महिलांची संख्या लोकसभेत किमान १८१ होणार ▶▶या आरक्षणात पोटआरक्षणही असणार आहे, ३३ टक्के पैकी काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वर्गाच्या महिलांसाठी आरक्षित असतील. ▶▶हे विधेयक मंजूर झाल्यानंतरच्या पहिल्या जनगणनेच्या आधारे जी पुनर्रचना होईल तेव्हा हे आरक्षण लागू होईल. म्हणजे २०२४ च्या निवडणुकीला हे आरक्षण लागू होणार नाही, हे जवळपास स्पष्ट आहे. ▶▶हे आरक्षण १५ वर्षांसाठी असेल असं विधेयकात म्हटलं आहे. पण एस सी, एस टी आरक्षणाप्रमाणे हे आरक्षणही नंतर वाढत राहू शकतं.

## विखे-पाटलांच्या भंडारा प्रकरणानंतर पोलीस सतर्क

### बच्चू कडूंच्या दौऱ्यात कार्यकर्त्यांची तपासणी



सुराज्य/सोलापूर

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर धनगर समाज कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी काही दिवसांपूर्वी भंडारा टाकला. या प्रकरणानंतर सतर्क झालेल्या शहर पोलिसांनी बुधवारी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या दौऱ्यात पत्रकार आणि कार्यकर्त्यांची तपासणी केली. सर्वांनाच तपासून प्रवेश देण्यात आला.

शासकिय कार्यक्रमासाठी प्रहार संघटनेचे नेते आ. बच्चू कडू बुधवारी सोलापुरात होते. येथील शासकिय विश्रामगृहात बुधवारी सकाळी ११.३० वाजता त्यांची पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेला आलेले प्रहारचे कार्यकर्ते, पत्रकार यांची पोलिसांनी तपासणी केली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर भंडारा टाकणाऱ्या धनगर समाज कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी रुमालात लपवून भंडारा आणला होता. पोलिसांच्या समोरच त्यांनी भंडारा टाकला होता.

या प्रकरणानंतर पोलिसांवर टीका झाली. त्यामुळे पोलिसांनी बुधवारी शासकिय विश्रामगृहात बच्चू कडू यांना भेटायला आलेले कार्यकर्ते, पत्रकारांचे खिसे, बॅगा, पाकिटे तपासली. पाकिटात काही लपवून आणले आहे याबद्दल विचारणा केली. ही तपासणी झाल्यानंतरही पोलिस बच्चू कडू यांच्या आजूबाजूला कोण थांबले आहे, काय करत आहे याची पाहणी करीत असल्याचे दिसून आले.

## ७५ टक्के महिला आमदार, खासदार क्रियाशील नाहीत : आ. कडू यांचे परखड मत

सुराज्य/सोलापूर



आपल्या देशात कायदा आणि व्यवस्था यात फार मोठा फरक आहे. आपल्या देशातील संस्कृती ही कायद्याला अनुसरून नाही. गुलामीत राहणारी महिला अद्यापही धर्माच्या आणि जातीच्या संकटातून बाहेर आलेली नाही. ७५ टक्के महिला आमदार, खासदार आणि लोकप्रतिनिधी या क्रियाशील नाहीत. त्यांचे नवरेच सर्व काम पाहतात. त्याबाबतीत देश अद्यापही अडाणीच आहे, असे खळबळजनक मत आ. बच्चू कडू यांनी केले आहे.

प्रहार संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार बच्चू कडू यांनी बुधवारी सोलापुरात पत्रकार परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते. कडू म्हणाले, आपल्याकडे जाती धर्माचा मोठा पगडा आहे. इथं दंगली तिरंग्यासाठी होत नाहीत. इथं लोक तिरंग्यासाठी रस्त्यावर येत नाहीत. निळा, हिरवा, भगव्याचा अपमान झाला की, लोक तिरंगा विसरून जातात आणि रस्त्यावर येतात. त्यामुळे केवळ कायदे करून उपयोग नाही, संस्कारही बदलले पाहिजे. कर्तृत्वाने येणाऱ्या महिला आणि आरक्षणातून येणाऱ्या महिला यात फार मोठा फरक पडतो. त्यामुळे त्या मतदारसंघात त्याचे परिणाम दिसतात. आरक्षणाची घाई करत आहेत. ठीक आहे, पण ते लोकांमध्ये रुजवावे लागेल. इथे कायदे पाळतं कोण? कायदे करणे ही राजकिय गरज असू शकते, असंही मत त्यांनी व्यक्त केले.

## गतिमंद मुलीचा विनयभंग; आरोपीला ५ वर्षे सक्तमजुरी

सोलापूर : एका गतिमंद मुलीचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून मल्लप्पा उर्फ मल्लिनाथ शिवप्पा बिराजदार (वय ४२ रा. सोलापूर) याला ५ वर्षे सक्तमजुरी आणि १ हजार रुपये दंड अशी शिक्षा विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी नुकतीच सुनावली.

पिडीत गतिमंद मुलीला घरात सोडून तिची आई बाहेर गेली होती. १८ जानेवारी २०२२ रोजी आरोपी मल्लप्पा बिराजदार हा तिला आपल्या घराकडे घेऊन जात होता. एका रिक्षा चालकाने हा प्रकार पाहून पिडीतेच्या आईला याची माहिती दिली. तेंव्हा हा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणात पिडीतेच्या आईने पोलिसात फिर्याद दाखल केली होती. जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे फौजदार चक्रधर ताकभाते यांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. आणि तपास करून आरोप पत्र न्यायालयात दाखल केले होते. सरकार पक्षातर्फे ७ साक्षीदार तपासण्यात आले.

या खटल्यात सरकारतर्फे ॲड. प्रकाश जन्नू तर आरोपीतर्फे ॲड. रेवण पाटील यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस शिपाई रफीक तांबोळी यांनी सहकार्य केले.

## तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

सोलापूर : नैसर्गिक आपत्तीला कंटाळून एका २५ वर्षीय शेतकऱ्याने शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली ही घटना बोर्ड कणबस तालुका दक्षिण सोलापूर येथे बुधवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. गोपाळ पांडुरंग जाधव (वय २५ रा. बोरुळ कणबस) असे मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्याने गुरूवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेतला होता.

त्याला फासातून सोडवून शाहरुख शेख (मित्र) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## गौरी आगमनानिमित्त बाजारपेठेत गर्दी

सोलापूर : गणेशोत्सवास सुरूवात झाली असून आता गुरूवारी घरोघरी गौरींचे आगमन होणार आहे. त्याच्या खरेदीसाठी बाजारपेठ सजली आहे. ज्येष्ठा गौरी सणानिमित्त बाजारामध्ये विविध वस्तूंच्या मागणीमध्ये वाढ झाली असून फराळाच्या पदार्थांच्या खरेदीसाठी महिलांनी गर्दी केली. यासोबतच आरास करण्यासाठीच्याही वस्तूंची खरेदी मोठ्या प्रमाणात करण्यात आली. सोन्याच्या पावलाने घरी येणाऱ्या महालक्ष्मीचे भाद्रपद महिण्यातील आगमन हे मागल्याचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. गुरुवारपासून उत्सव चालणार आहे. सजावट साहित्य, मकर, फळे, फुले, मिठाई, ज्वेलरी, इलेक्ट्रीक बाजार अशा सर्वच ठिकाणी महिलांची खरेदीसाठी बुधवारी गर्दी झाली होती.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



३३%चे श्रेय १००% घेण्याचा प्रयत्न सगळे करताहेत!

| कल्याण |
| --- |
| 136-03-247 |

| मुंबई |
| --- |
| 158-44-770 |

## उजनीत येणारा दौंडचा विसर्ग पुन्हा वाढू लागला

सुराज्य/टेंभुर्णी

**उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या जोरदार पावसामुळे दौंडच्या विसर्गात पुन्हा वाढ दिसून येत आहे. गुरूवारी सकाळी दौंडचा विसर्ग ४३० क्युसेक होता त्यामध्ये वाढ होवून संध्याकाळी २८०९ क्युसेक झाला आहे, त्यामुळे उजनीच्या पाणीसाठ्यात सकाळपासून किंचित का होईना वाढ होण्यास सुरवात होणार आहे.**

गेल्या दोन दिवसांपासून उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस वाढल्यामुळे कधी कमी तर कधी जास्त पाणी साठा होत होता. परंतु बंडगार्डन येथून येणाऱ्या विसर्गात गेल्या दोन दिवसात वाढ होत नसल्याने त्याचा परिणाम दौंड येथील विसर्ग होतो आहे. काल दौंडचा विसर्ग ४३० होता त्यात बुधवारी दुपारपासून वाढ होत असून संध्याकाळी सहा वाजता तो २८०९ झाला. परंतु हा विसर्ग उजनीत येण्यास जवळपास आठ ते दहा तास लागतात त्यामुळे सकाळपासून उजनीच्या पाणीसाठ्यात हळूहळू का होईना वाढ होण्यास सुरुवात होणार आहे.

बुधवार दुपारपासून उजनीतून भीमा नदीमध्ये वीज निर्मितीद्वारे १६०० क्युसेक आणि ८ दरवाजातून ३४०० क्युसेक असा विसर्ग चालू केला. त्यामुळे गुरूवार सायंकाळपर्यंत उजनी धरणातून १.५ सेंटीमीटर पाणी कमी झाले आहे. उजनीतून सोलापूर पंढरपूरआणि सांगोला शहरासाठी पिण्यासाठी सोडलेले पाणी किमान दहा ते अकरा दिवस चालू राहील. त्यामुळे उजनीतील जवळपास सहा टीएमसी पाणीसाठा कमी होणार आहे. म्हणजेच दहा ते बारा टक्के पाणी कमी होणार आहे. परंतु दौंडचा विसर्गामध्ये थोडीशी वाढ होऊ लागल्याने जरा समाधानाची बाब आहे. उजनीला थोडासा दिलासा मिळणार आहे. तसेच उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात, धरणकाठच्या भागांमध्ये बुधवारी दुपारपासून चांगला पाऊस चालू झाल्यामुळे त्याचाही परिणाम उजनीच्या पाणी साठा वाढण्यात मदत होणार आहे.

### भीमा नदीत ५००० चा विसर्ग चालू



**उजनीची पाणीपातळी पुढीलप्रमाणे**

एकूण पाणीसाठा...४९२.६५० मी.
एकूण पाणीपातळी ..२१४५.२१ द.ल.घ.मी.
उपयुक्त पाणीपातळी .३४५.२१ द.ल.घ.मी.
टक्केवारी ...२२.८५%

## डॉक्टरच्या गळ्यातील चार तोळ्याचे मंगळसूत्र पळविले

पंढरपूर : शहरातील एका महिला डॉक्टरच्या गळ्यातील चार तोळ्याचे मंगळसूत्र मोटारसायकलवर आलेल्या दोन इसमाने पळवून नेल्याची घटना बुधवारी सकाळी घडली आहे. डॉ. वर्षा सुरेंद्र काणे (वय ५७, रा. कराड रोड, संभाजीनगर, टाकळी, ता. पंढरपूर) या बुधवारी सकाळी साडे आठच्या सुमारास नवीन कराड नाका येथून काणेज हॉस्पिटलकडे जात होत्या.



या दरम्यान त्या सहारा हॉटेल समोरून जात असताना समोरून दोन इसम मोटार सायकलवर आले अन् त्यांनी वर्षा काणे यांच्या गळ्यातील ४ तोळे वजनाचे सोन्याचे मणीमंगळसूत्र हिसका मारून जबरदस्तीने तोडून घेऊन पळून गेले. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CMYK